Rotary
Club of Latur Mid-town

UNITE FOR GOOD

## साप्ताहिक

# रोटरी दिशा

## ROTARY CLUB OF LATUR MID-TOWN

ROTARY INTERNATIONAL DISTRICT 3132 | Club No.: 22604

मे- २०२६ | तिसावा अंक

## ब्लड डोनेशन विशेषांक





**Rtn.Francesco Arezzo**
RI President 2025-26



**Rtn.Sudhir Lature**
Dist.Governor 2025-26



**Rtn.Amol Dadge**
President



**Rtn.Pawan Malpani**
Secretary

## Guest Editor Rtn.Jayesh Pedde



प्रिय रोटेरियन बंधू-भगिनींनो,

रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनच्या ''दिशा'' या बुलेटिनचा मे महिन्यातील द्वितीय साप्ताहिक अंक आपल्या हाती देताना मला अत्यंत आनंद होत आहे. अतिथी संपादक म्हणून या विशेष अंकातून आपल्याशी संवाद साधण्याची संधी मिळणे, ही माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे.या अंकाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे आपल्या क्लबद्वारे आयोजित करण्यात आलेला भव्य मेगा ब्लड डोनेशन कॅम्प. स'ाजसेवेच्या भावनेतून आयोजित या उपक्रमाला नागरिकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला आणि या शिबिरामध्ये तब्बल ७२९ रक्ताच्या बाटल्यांचे संकलन करण्यात आले. ही केवळ एक संख्या नसून, अनेक गरजू रुग्णांना जीवनदान देणारी आशेची शक्ती आहे.रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान मानले जाते. एका रक्तदात्यामुळे अनेकांचे प्राण वाचू शकतात, अनेक कुटुंबांना नवजीवन मिळू शकते. आपल्या क्लबने आयोजित केलेल्या या उपक्रमातून समाजात रक्तदानाविषयी जनजागृती निर्माण झाली आणि '' Donate Blood, Save Life '' हा संदेश प्रभावीपणे जनमानसात पोहोचला.याच सेवाभावी कार्याच्या गौरवार्थ आपण हा अंक ''रक्तदान विशेषांक'' म्हणून प्रकाशित करत आहोत. या विशेषांकाच्या माध्यमातून रक्तदान शिबिरातील क्षण, स्वयंसेवकांचे योगदान, रक्तदात्यांचा उत्साह आणि समाजसेवेचा संदेश सर्वांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला आहे.या यशस्वी उपक्रमासाठी परिश्रम घेणारे सर्व आयोजक, डॉक्टर, स्वयंसेवक, रक्तदाते आणि सहकार्य करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे मनःपूर्वक अभिनंदन व आभार. आपल्या सर्वांच्या एकजुटीमुळेच हा उपक्रम ऐतिहासिक यश संपादन करु शकला.चला तर, समाजसेवेची ही प्रेरणा अशीच कायम ठेवूया आणि रोटरीच्या “Service Above Self” या मूल्याला अधिक दृढ करूया.

रो.जयेश पेद्दे
अतिथी संपादक, रोटरी दिशा

## Secretary Report

- राष्ट्रगीताने मिटींग ची सुरुवात झाली.
- फोरवे टेस्ट चे वाचन सामुहिकरीत्या झाले.
- अध्यक्षांनी सर्वांचे शब्द सुमनांनी स्वागत केले.
- साप्ताहिक पत्रव्यवहार अध्यक्षांनी सादर केला
- मागील मिटींग क्र. ४२ चे अहवाल वाचन सचिव पवन मालपानी यांनी केले..
- साप्ताहिक पत्रव्यवहार अध्यक्षांनी सादर केली.
- १ मे रोजी मेगा ब्लड डोनेशन कॅम्प शहरातील ५ पोलीस स्टेशन मध्ये संपन्न झाला
- एमआयडीसी पोलिस स्टेशन मध्ये संपन्न झालेल्या ब्लड डोनेशन ची माहिती रो. सुमित दाड व रो. गणेश सावंत यांनी दिली.
- ग्रामीण पोलिस स्टेशन बद्दलची माहिती रो. शिरीष उटगे यांनी दिली. प्रेसिडेंटइलेक्ट रो. रमेश चिल्ले यांनी ही अनुभवकथन केले.
- विवेकानंद पोलिस स्टेशन बद्दलची माहिती रो. प्रशांत भाटगावे यांनी दिली.
- गांधी चौक पोलिस स्टेशन बद्दलची माहिती रो. अमोल बनाळे यांनी दिली.
- एस.पी. ऑफीस बद्दलची माहिती रो. प्रशांत भाटगावे यांनी दिली.
- लातूर सायक्लिस्ट क्लब सोबत २८ जुन रोजी लातूर सायक्लॉथॉन २०२६ चे आयोजन करण्यात येणार असल्याचे रो. अमोल बनाळे यांनी सांगितले.
- क्लब बुलेटिन : साप्तहिक रोटरी दिशा चे अनावरण सदस्य रो. चंद्रकांत बारस्कर व रो. अमोल बनाळे यांच्या हस्ते करण्यात आले. अतिथी संपादक म्हणून रो. कपिल पोकर्णा यांनी कार्य केले.
- माजी अध्यक्ष रो. रविंद्र बनकर यांनी ब्लड जोनेशन यशस्वी झाल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन केले
- फेलोशिप अनाउन्समेंट रो. श्रध्दानंद अपशेट्टी यांनी केली.

### Man of The Meeting



Rtn.Sumit Daad

### 1st Come in the Hall



Rtn. Chandrakant Baraskar

# Mega Blood Donation Camp

**अध्यक्ष रो. अमोल दाडगे यांचे मनोगत**

**नमस्कार मित्रांनो,**

**काल आपल्या क्लबचा भव्य रक्तदान शिबीर यशस्वीरित्या पार पडला. हे रक्तदान शिबीर एकाच वेळी ५ पोलीस स्टेशन मध्ये सकाळी ७:०० ते संध्याकाळी ६:०० वाजेपर्यंत घेण्यात आले.या रक्तदान शिबिरामध्ये आपण आपल्या क्लब तर्फे  रक्तदात्यास हेल्मेट चे वाटप केले आहे. या कार्यात MIDC Police Station मध्ये रो. गणेश सावंत आणि अगदी नवीन आपल्या रोटरी परिवारात सामील झालेले रो. सुमित दाड, सोबत रो. गिरीश पेन्सलवार यांनी कार्य सांभाळले. SP Office मध्ये रो. मोतीलाल वर्मा, निलेश इटकर यांनी कार्य सांभाळले. गांधी चौक पोलीस स्टेशन मध्ये रो. अमोल बनाळे, पोस्ट प्रेसिडेंट रो. विष्णुदास तोष्णीवाल, रो. डॉ. अविनाश भोसले यांनी कार्य सांभाळले. विवेकानंद पोलीस स्टेशन मध्ये रो. पवन मालपाणी, रो. प्रशांत भाटगावे यांनी कार्य सांभाळले.आणि ग्रामीण पोलीस स्टेशन मध्ये रो. रमेश चिल्ले, रो. शिरीष उटगे, रो. उमेश पत्रावळे, रो. किशोर दाताळ यांनी कार्य सांभाळले. आपल्या क्लब मधील बऱ्याच सदस्यांनी या कार्यात सहभाग नोंदवला आहे.आपल्या सर्वच क्लब सदस्यांनी कार्यास संमती देऊन सहकार्य केले. आपल्या रोटरी क्लब ऑफ  लातूर मिडटाउन परिवारातील सर्व सदस्यांचे अभिनंदन आणि हार्दिक आभार.**

**धन्यवाद.**


लातूर पोलीसांचा आदर्श उपक्रम :
महाराष्ट्र दिनी ७२९ जणांचे रक्तदान
१००० हेल्मेटचे वाटप : रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन, भालचंद्र ब्लड बँकेचा पुढाकार
कुठे किती झाले रक्तदान...



























# Rotary Mid Town this Week  Photo Gallery













A Historic Triumph for Rotary District 3132! For the first time ever, we celebrate an extraordinary milestone — $4,00,000 contribution to The Rotary Foundation! This achievement is not just a number, it's a reflection of vision, dedication, and unstoppable teamwork. Kudos to the dynamic Clubs of 3132 and Team TRF 2025–26 for leading from the front and turning commitment into impact. Together, we are not just raising funds... We are creating hope, transforming lives, and building a stronger tomorrow.  Unite for Good Serve with Purpose    Inspire the World